**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८**
**पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय**
**संत तुकारामनगर, पिंपरी-१८**

**जाहिरात क्र.१२३५/२०२१**

**दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात विविध डॉक्टरांची पदे भरणेबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाच्या अस्थायी अस्थापनेवरील खालील नमुद केलेली पदे करार पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर फक्त ६ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात भरणेबाबत प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन/थेट पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणा-या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल. पदनाम, पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे...

***वरिष्ठ निवासी एकूण मंजुर पदे-६१ .***

| अ.क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | विजा अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमा प्र | इमाव | आ.दु.घ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| १ | मेडीसीन | ०५ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०१ |
| २ | गायनेंक | ०५ | ०१ | - | ०१ | | | | | ०१ | ०१ | ०१ |
| ३ | सर्जरी | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ४ | ऑर्थोरोग | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ५ | रेडिओलॉजी | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ६ | बालरोग ICU | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ७ | कम्युनिटी(मेडी | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ८ | भुलशास्त्र | १० | ०१ | ०१ | ०१ | | | | - | ०२ | ०१ | ०४ |
| ९ | बालरोग | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| १० | इमर्जन्सी वॉर्ड | ०३ | ०१ | - | - | | | | - | ०१ | - | ०१ |
| ११ | आय.सी.यु | १२ | ०२ | ०१ | ०१ | | | | - | ०२ | ०१ | ०५ |
| १२ | रूग्णालय प्रशासन | ०२ | ०१ | - | - | | | | - | - | - | ०१ |
| १३ | मानसोपचार | ०१ | आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१)(घ) तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. | | | | | | | | | ०१ |
| १४ | कान,नाक घसा | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १५ | त्वचा रोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १६ | उरोरोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १७ | नेत्ररोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १८ | डायलेसिस | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| | **एकूण-** | ६१ | १३ | ०२ | ०४ | | | | **-** | १३ | ०४ | २५ |

***कनिष्ठ निवासी एकूण मंजुर पदे-६३,***

| अ.क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमा प्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | २५% |
| १ | मेडीसीन | १४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०३ | ०१ | ०५ |
| २ | गायनेंक | ०७ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०३ |
| ३ | सर्जरी | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ४ | दंतरोग | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ५ | डायलेसिस | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ६ | बालरोग ICU | ०४ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ |
| ७ | इमर्जन्सी वॉर्ड | ०४ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ |
| ८ | आय.सी.यु | १६ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०३ | ०२ | ०६ |
| ९ | उरोरोग | ०२ | प्रथम अ.जा. त्यानंतर अ.ज.,विजाभज,-{विजाअ,भज-ब,भज-क,भज-ड},इ.मा.व,विमाप्र व इडब्ल्युएस या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध आहे. | | | | | | | | | ०१ |
| १० | त्वचारोग | ०२ | | | | | | | | | | ०१ |
| ११ | ट्युटरमायक्रो-बायोलॉजी | ०२ | | | | | | | | | | ०१ |
| १२ | ट्युटर (पॅथो) | ०२ | | | | | | | | | | ०१ |
| १३ | नेत्ररोग | ०१ | आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१) (घ) तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. | | | | | | | | - | ०१ |
| | **एकूण-** | ६३ | १० | ०२ | ०५ | | | | **-** | १२ | ०६ | २४ |

***वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ एकूण मंजुर पदे५ ,वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी एकूण मंजुर पदे८ व वैद्यकिय अधिकारी बी.टी.ओ एकूण पदे-०२***

| अ.क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | २५% |
| १ | सीएमओ | ०५ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०१ |
| २ | न्याय वैद्यक शास्त्र शिफ्ट ड्युटी | ०८ | ०१ | ०१ | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०३ |
| ३ | ब्लड बॅक बी.टी.ओ | ०२ | प्रथम अ.जा.त्यानंतर अ.ज.,विजाभज,-{विजाअ,भज-ब,भज-क,भज-ड},इ.मा.व,विमाप्र व इडब्ल्युएस या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. | | | | | | | | | ०१ |
| | **एकूण** | १५ | ०२ | ०१ | ०२ | | | | **-** | ०२ | ०२ | ०५ |

***शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसारद्यावयाचे दरमहा मानधन***

| *अ.क्र.* | *पदनाम* | *शैक्षणिक अर्हता* | *एम.बी.बी.एस बी.डी.एस* | *संबधीत विषयाचा डिप्लोमा* | *संबधीत विषयांची पदवी* |
|---|---|---|---|---|---|
| १ | **वरिष्ठ निवासी** | एम.एस.बी.बी.+डिप्लोमा/MD/MS/DNB तसेच एम.एम.सी. रजि.अद्यावत असणे आवश्यक. | -- | ६००००-/ | ६५०००-/ |
| २ | **कनिष्ठ निवासी** | एम.बी.आवश्यक अद्यावत असणे.रजि .सी.एम.एम .एस.बी. | ५५०००-/ | - | - |
| ३ | **कनिष्ठ निवासी** | बी /.एस.डी.एम.अद्यावत असणे आवश्यक.रजि .सी.डी. | ५५०००-/ | - | - |

***वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ/शिफ्ट ड्युटी/बी.टी.ओ***

| **अ.क्र** | **विभागनिहाय पदाचे नाव** | **शैक्षणिक अर्हता** | **दरमहा मानधन रक्कम** |
|---|---|---|---|
| **१** | **वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ** | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण. एम.एम. सी रजि. अद्यावत असणे आवश्यक. | ७५०००/- |
| **२** | **न्याय वैद्यक शास्त्र वैद्यकिय अधिकारी (Shift Duty)** | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण एम.एम. सी रजि. अद्यावत असणे आवश्यक. | ७५०००/- |
| **३** | **ब्लड बॅक वैद्यकिय अधिकारी (बी.टी.ओ)** | मान्यता प्राप्त विद्यापीठाची MBBS/DCP उत्तीर्ण व FDA approved, MD path प्राधान्य. एम.एम. सी रजि. अद्यावत असणे आवश्यक | एमबीबीएस-७५०००/-<br>पदविका-८००००/-<br>पदवी- ८५०००/- |

अटी शर्ती-

१) करार पध्दतीने मानधनावरील नेमणुका फक्त ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत.

२) करार पध्दतीने नियुक्ती फक्त सहा महिने कालावधीसाठी देण्यात आल्यामुळे संबधीतांस महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशणा बाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. तसेच ६ महिने नेमणूक कालावधी पुर्ण झाल्यानंतर पुनश्च नेमणूक मिळणार नाही. या सर्व बाबीचे अर्जदाराने र.रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर विहित नमुन्यात हमीपत्र देण्यात यावे.

३) ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

४) कागदपत्रे तपासणीस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

५) अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही. संबधीत उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

६) सर्व उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीसाठी उपस्थीत राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, एम.एम.सी रजि. व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व सांक्षाकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशिट) प्रमाणपत्र, फोटो, अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहेत.

७) निवड केलेल्या उमेदवांराना मनपाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. रूग्णालयीन/कोरोना संबधी कामकाज करणेस नकार दिलेस नेमणूक तात्काळ रद्द करणेत येईल.

८) सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

९) वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी यांना २४ तास रूग्णालयात राहून काम करावे लागेल. ज्या युनिटमध्ये किंवा वॉर्डामध्ये नेमणूक होईल त्यांचे अधिपत्याखाली काम करावे लागेल.

१०) यापुर्वी मागील सहा महिने कालावधीत यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात काम केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करू नये. त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) उमेदवारांनी कार्यालयीन/ रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१२) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील. व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

१३) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकारी राहील.

१४) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१५) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उद्धवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही

१६) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रूजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१८) निवड झालेल्या उमेदवारांस एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

१९) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबाबतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी/ निवड रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२०) अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२१) मनपा/ रूग्णालयीन सेवेत असताना उमेदवारांच्या चुकीमुळे मनपाचे/ रूग्णालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेणेत येईल.

२२) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग, अनुभव, अंतिम परिक्षा वर्षातील गुण इत्यादी अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधीत रकान्यात स्पष्टपणे नमुद केले नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

२३) कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे/अपुर्ण कागदपत्रे सादर करणारे उमेदवारास निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२४) अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा अचुक ई-मेल, पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२५) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी निवेदने,निवड व प्रतिक्षायादी व इतर सुचना ह्या वेळोवळी मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सुचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांने समक्ष यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय चाणक्य कार्यालयामध्ये येवून विचारणा करू नये.

२६) अर्ज करणा-या उमेदारांनी दि.०७/१२/२०२१ पर्यंत ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे. त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, एम.एम.सी रजि. व इतर सर्व अर्हताधारण करणे/अटीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२७) अर्ज करणा-या उमेदवारांनी एका पदासाठी एकच अर्ज करावा. इतर पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. एकाच अर्जावर इतर पदांचा उल्लेख करून नये असे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

२८) उमेदारांना वयाची अट लागू राहणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता दिनांक-०१/१२/२०२१ ते दि.०७/१२/२०२१ अखेर पदव्युतर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील चाणक्य प्रशासकीय कार्यालयातील हॉलमध्ये स.१०.०० ते सायं-५.०० या वेळेत विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरून त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती व मुळ प्रतीसह समक्ष उपस्थित राहून अर्ज सादर करावा. पोस्टाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन दि.०७/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते सायं ५.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखीपरिक्षा/मौखीक मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील मनपाचे वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सही/-
(राजेश पाटील)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

जाहीरात क्र.१२३५/२०२१
रोटेशन क्र.-
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/१३८८/२०२१
दिनांक- २९/११/२०२१.

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

**प्रति,**
**मा.आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**विषय–** यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधनावरील
---------------------------------------------------या पदासाठी अर्ज.

**संदर्भ-** वायसीएमएच/७/कावि/ १३८८/२०२१ दि.२९ /११/२०२१**, जाहिरात क्र.१२३५/२०२१**

**महोदय,**

संदर्भिय जाहिरातीनुसार मी श्री/श्रीम.----------------------------------------------- हंगामी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ---------------------------------------- या पदासाठी जाहिरातीमधील आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन या पदासाठी निवड होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| | आडनाव | स्वत:चे नाव | वडिल/पतिचे |
|---|---|---|---|
| **ENGLISH** | | | |

**१) संपुर्ण नाव (मराठीत) – ----------------------------------------------------------------------------**

**२) पत्रव्यवहारचा पत्ता- ----------------------------------------------------------------------------**

**----------------------------------------------------------------------------**

**३) जन्म दिनांक - / /** **मोबाईल क्र. –**

**४) लिंग - पुरुष** ☐ **स्त्री-** ☐ **ईमेल आयडी -**

**५) जात -** **प्रवर्ग –**

**६) महाराष्ट्र मेडीकल/इंडीयन मेडीकल कौन्सिल/नर्सेस कौन्सिल कडील नोंदणी क्र. -----------------**
**दिनांक - / /**

७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल–

| अ.क्र. | शैक्षणिक | संस्था विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

८) तात्रिंक व इतर अर्हता तपशिल - ----------------------------------------------------------------

अनुभवाचा तपशिल –

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

| एकुण अनुभव - | वर्ष - | महिने- | दिवस- |
|---|---|---|---|

वरील नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कोणतीही कायदेशिर कारवाई केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

अर्जदाराची सही

स्थळ – पिंपरी-१८ (नाव- श्री./श्रीम- ----------------------------------)

दिनांक- / /२०२१.

सहपत्रे– अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडलेल्या आहेत.
(ज्या क्रमाने जोडलेल्या आहेत त्याप्रमाणे लिहणे)

१) ---------------------------------------------------

२) ---------------------------------------------------

३) ---------------------------------------------------

४) ---------------------------------------------------